महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक 09/06/ /०५/२०२३

**परिपत्रक -**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,वित्त विभाग, निर्णय क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २४/०५/२०२३.

**विषय :-** राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या हप्त्यांचे प्रदान करण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,निर्णय क्र.वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२४.०५.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०५२४१३२७५३७३०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

09/06/2023

( सुनिता चौधरी )
कार्यालय अधीक्षक
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / नियोजन व समन्वय /विशेष कृती / प्रशिक्षण व खास पथके/ रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन / दहशतवाद विरोधी पथक/आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत -

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२/- उपरोक्त शासन निर्णय या कार्यालयाच्या संकेतस्थळावर कृपया प्रकाशित करण्यात यावा, ही विनंती



Scanned with CamScanner

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या हप्त्यांचे प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र.८/सेवा-९
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०२३

वाचा - १. वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांक: वेपूर - २०१९/प्र. क्र. १/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९
२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: सेनिवे - २०१९/प्र. क्र. ५८ /सेवा-४, दिनांक २४ जानेवारी, २०१९
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र. ८/सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९
४. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक: सेनिवे - २०१९/प्र. क्र. ५८ /सेवा-४, दिनांक १ मार्च, २०१९
५. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र. ८/सेवा-९, दिनांक ३० मे, २०१९
६. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र. ८/सेवा-९, दिनांक २३ जून, २०२०
७. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र. ८/सेवा-९, दिनांक ३० जून,२०२१
८. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः वेपुर-२०१९/प्र. क्र. ८/सेवा-९, दिनांक ०९ मे,२०२२

**प्रस्तावना -**

शासन अधिसूचना वित्त विभाग, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी सन २०१९-२० पासून पुढील ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्याचा आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रोखीने अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची कार्यपद्धती शासन परिपत्रक वित्त विभाग, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित केली आहे. तसेच राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या थकबाकीची रक्कम ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याबाबत शासन परिपत्रक ३० मे, २०१९ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

Scanned with CamScanner

तसेच निवृत्तिवेतनाच्या थकबाकीची रक्कम ५ वर्षांत, ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१९ आणि दिनांक १ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशित केले आहे.

राज्यात कोविड - १९ (कोरोना) या विषाणूच्या साथीमुळे उद्भवलेली परिस्थिती व त्यामुळे राज्याच्या महसूली जमेवर झालेला प्रतिकूल परिणाम विचारात घेऊन शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक ०९ मे, २०२२ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ जुलै, २०२१ रोजी देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या तिसऱ्या हप्त्याचे प्रदान दिनांक ०९ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आले आहे. तसेच या शासन निर्णयामध्ये उर्वरीत देय असलेल्या हप्त्यांचे प्रदान करण्यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता.

वरील पार्श्वभूमीवर थकबाकीच्या उर्वरीत हप्त्यांच्या प्रदानासंबंधीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय -**

शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै, २०२२ रोजी देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या अनुक्रमे वेतन आणि निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या ४ थ्या हप्त्यांची रक्कम पुढे नमूद केल्याप्रमाणे यथास्थिती भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्यात यावी अथवा रोखीने अदा करावी:-

(अ) निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तिवेतनाच्या थकबाकीच्या ४ थ्या हप्त्याची रक्कम माहे जून, २०२३ च्या निवृत्तिवेतनासोबत रोखीने अदा करण्यात यावी.

(ब) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या थकबाकीच्या ४ थ्या हप्त्याची रक्कम माहे जून, २०२३ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

(क) सर्व जिल्हा परिषदा, शासन अनुदानित शाळा आणि इतर सर्व शासन अनुदानित संस्थांमधील पात्र कर्मचाऱ्यांच्या थकबाकीच्या ४ थ्या हप्त्याची रक्कम माहे जून, २०२३ च्या च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

वरील (ब) आणि (क) मधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत-



Scanned with CamScanner

(i) भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या थकबाकीची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्यात यावी आणि राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांच्या थकबाकीची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी.

(ii) जे कर्मचारी (भविष्य निर्वाह निधी योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांसह) दिनांक १ जून, २०२२ ते या शासन आदेशांच्या दिनांकापर्यंत सेवानिवृत्त झाले असतील अथवा मृत्यू पावले असतील, अशा कर्मचाऱ्यांना वेतनाच्या थकबाकीच्या उर्वरीत हप्त्यांची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी.

२. कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्यात येणाऱ्या थकबाकीच्या ४ थ्या हप्त्यांच्या रकमेवर शासन परिपत्रक दिनांक २० फेब्रुवारी,२०१९ मधील परिच्छेद क्र.१४ मधील तरतुदीनुसार दिनांक १ जुलै, २०२२ पासून व्याज अनुज्ञेय राहील.

३. भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्यात आलेली रक्कम २० फेब्रुवारी,२०१९ मधील परिच्छेद क्र.१४ मधील तरतूदी प्रमाणे काढता येणार नाही.

४. थकबाकीच्या रकमेच्या प्रदानासंबंधी वरील वाचा - क्रमांक १ ते ५ येथील शासन आदेशांतील अन्य तरतूदींचे अनुपालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग/सेवा - ४ कार्यासनाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३४-अ/२३/सेवा-४, दिनांक १८.०४.२०२३ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०५२४१३२७५३७३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VINAYAK ARVIND DHOTRE

Digitally signed by VINAYAK ARVIND DHOTRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
cn=VINAYAK ARVIND DHOTRE
Date: 2023.05.24 13:30:25 +05'30'

( वि. अ. धोत्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव



Scanned with CamScanner

३. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
४. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. विरोधी पक्षनेते विधानपरिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
८. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१०. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
१३. सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
१४. मंत्रालयीन सर्व विभाग
१५. मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
२२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२४. राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
२५. सर्व विभागीय आयुक्त
२६. सर्व जिल्हाधिकारी
२७. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
२८. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
२९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व कोषागार अधिकारी
३३. लेखाधिकारी, सर्व वेतन पडताळणी पथके,मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
३४. मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३५. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर
३६. कुलसचिव, सर्व कृषि आणि कृषितर विद्यापीठे



Scanned with CamScanner

३७. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई
३८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती नागपूर
३९. बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
४०. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी .ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
४१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४
४२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
४३. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
४४. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट,मुंबई-२१
४५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
४६. वित्त विभागातील सर्व कार्यासने
४७. निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९).



Scanned with CamScanner